# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १०९ दिनांक- १९/०४/२०२१

## काशिमीरा पो.ठाणे कार्यक्षेत्रात,अंमली पदार्थ व तलवारीसह कुख्यात ड्रग्स विक्रेता व त्याचे साथीदारांना अटक. अंमली पदार्थ विरोधी पथकाची यशस्वी कारवाई.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे नेमणुकीस असलेले श्री.शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोहवा/२४४८ अनिल पवार, पोना/११४० वसिम शेख, व पोकॉ/१६ गणेश वनवे असे दि.१८/०४/२०२१ रोजी रात्रौ गस्त करीत असतांना, रात्रौ ०३.४५ वा.चे सुमारास आर.टि.ओ शिफ्टींग झोपडपट्टी येथून जात असताना, लॉकडाऊन दरम्यान ५ इसम सदर ठिकाणी संशयीत रित्या एकत्र चालले असतांना दिसले. संशयास्पद हालचालीवरुन पोलीसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला असता ते पळू लागले. ते संशयास्पद असलेने त्यांचा पाठलाग करून त्यापैकी तिघा इसमांना जागीच पकडले. दोन इसम जे तलवारीसह होते त्यांनी त्यांचे जवळील तलवारी जागीच फेकुन आंधाराचा फायदा घेवुन पळून गेले.

नमूद ताब्यात पकडलेल्या तिघा इसमांची कायदेशीर अंगझडती घेतली. इसम नामे संदीप शंकर नांगरे, वय ३२ वर्षे, रा.रूम नं.३२, आर.टि.ओ शिफ्टींग, घोडबंदर, काशिमिरा, ता.जि.ठाणे याच्या अंगझडतीमध्ये एक तलवार व ८० ग्रॅम अमली पदार्थ एमडी (मेफेड्रॉन) मिळून आले. तसेच इसम नामे सुर्यकांत प्रभाकर करळकर, वय २७ वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रा.रूम नं.७२, आर.टि.ओ शिफ्टींग चाळ, काशिमिरा, ता.जि.ठाणे, व शाकीर आसिफ सय्यद, वय ३४ वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रा.रूम नं.२०८, आर.टि.ओ ऑफिस, घोडबंदर, कशमिरा, ता.जि.ठाणे यांचे ताब्यात प्रत्येकी एक एक तलवारी मिळून आल्या. सदर ठिकाणी पोलीसांनी कारवाई करून ५ तलवारी व ८० ग्रॅम अमली पदार्थ एमडी (मेफेड्रॉन) असा एकुण ८,०८,६००/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. तलवारी फेकुन पळून गेलेल्या इसमांची नावे जब्बार व साहिल असे असून सर्व आरोपी हे आर.टि.ओ शिफ्टींग झोपडपट्टीत राहणारे आहेत.

सदरबाबत काशिमिरा पोलीस ठाणे येथे,गुन्हा रजि.नं३३८/२०२१ भा.द.वि.सं कलम३९९, सह अंमली पदार्थ विरोधी कायदा सन.१९८५ चे कलम ८ (क), २०,२९ सह भारतीय हत्यार कायदा ४,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री.सुदर्शन पोतदार हे करीत आहे.

सदरची कारवाई, डॉ.श्री. महेश पाटील,पोलीस उपायुक्त(गुन्हे),श्री रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त(गुन्हे),यांचे मार्गदर्शनाखाली श्री.शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोहवा/२४४८ अनिल पवार, पोना/११४० वसिम शेख, व पोकॉ/१६ गणेश वनवे या अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner